# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६/फाल्गुन ५, १९४७ शके

२३. महाराष्ट्र विधानसभा नियम १०६ (३) अन्वये शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ रोजी सभागृहात चर्चेसाठी घेण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांच्या सूचना :-

(१) **श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. ४१**

" राज्यात देशी खेळांऐवजी इतर खेळांमध्ये लक्षणीय वाढ होऊन खेळाडूंचे देशी खेळांकडे झालेले दुर्लक्ष, त्यामुळे राज्यात देशी खेळ टिकून राहण्यासाठी विशेषत: ग्रामीण भागातील होतकरू व तरुण खेळाडू, देशी खेळांमध्ये मोठ्या प्रमाणात आकर्षित होऊन त्यांच्यामध्ये असलेल्या क्रिडा नैपुण्याला वाव मिळण्यासाठी विशिष्ट प्रोत्साहनपर योजना राबविण्याकरिता शासनाच्या क्रिडा धोरणामध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) **श्री. भिमराव तापकीर, वि.स.स. यांचा ठराव क्र. २९**

"पुणे शहरातील मुळा-मुठा नद्या आणि इतर जलस्रोत गंभीर प्रदूषित असणे, अपुरी सांडपाणी प्रक्रिया क्षमता, अनधिकृत बांधकामांमुळे नद्यांमध्ये सांडपाणी मिसळणे, पाणीपुरवठयाचे असमान वितरण (काही भागात ६०० लिटर तर काहीत १०० लिटर प्रति व्यक्ती), खडकवासला आणि इतर धरणांमधील प्रदूषण वाढणे, यामुळे पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता धोक्यात येणे आणि आरोग्य समस्या निर्माण होणे, नद्यांचे पुनरुज्जीवन आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांना (जसे JICA) गती देणे आवश्यक असणे, तरी शासनाने पुणे शहर आणि जिल्ह्यातील नदी प्रदूषण रोखण्यासाठी आणि पाणीपुरवठा समान व न्यायपूर्ण करण्यासाठी तातडीने कालबद्ध योजना राबवावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **श्री. अनिल मांगुळकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. ८९**

" राज्यात उद्योग जगतात मोठ्या प्रमाणात स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार उपलब्ध न होणे, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांची संख्या नगण्य असल्याने राज्यात बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढणे, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये लाखो तरुणांनी नोकरीसाठी केलेली नोंद, उद्योगांमध्ये भूमीपुत्रांना नोकऱ्या देण्यास शासन अपयशी ठरल्याने राज्यातील सुशिक्षित तरुणांमध्ये पसरलेले नैराश्य, राज्यातील शासकीय, निमशासकीय तसेच खाजगी आस्थापनांवरील कार्यालयांमध्ये नोकरी देतांना स्थानिक भूमीपुत्रांना प्राध्यान्याने नोकरीत घेण्यासाठी शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(४) **श्री भास्कर जाधव, वि.स.स. यांचा ठराव क्र. १५५**

"कोकणातील समुद्र, खाडीमध्ये मासेमारी करणारा मच्छीमार बांधव हा गेल्या काही वर्षापासून समुद्रात होणारी सततची वादळे, चक्रीवादळे, करोनाचे संकट, मासेमारी बंदी अशा वेगवेगळया संकटांमध्ये सापडलेला असणे, त्यात राज्याच्या हद्दीत मोठमोठे ट्रोलरद्वारे मच्छिमारी करण्याचे वाढलेले प्रमाण, या परराज्यातील मच्छिमारांकडून स्थानिक मच्छिमारांवर सातत्याने होणारे हल्ले, त्याचबरोबर पारंपारिक व पर्ससिनेट मच्छिमार यांच्यात वारंवार निर्माण होणारे संघर्ष, परिणामी मत्स्योत्पादानात झालेली कमालीची घट, गाळाने भरलेली बंदरे, त्यामुळे व्यवसायावर झालेला परिणाम, मत्स्यदुष्काळ असो वा अन्य कोणतीही संकटे आली तरी मच्छिमार समाजाला शेतकऱ्यांप्रमाणे कर्जमाफी किंवा अन्य मदत मिळण्यासाठी शासनाने विशेष प्रयत्न करावेत, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

.. २/-

(५) **<u>ॲड. राहूल कुल, वि.स.स. यांचा ठराव क्र. १७४</u>**

"दारिद्रय रेषेखालील कुटूंबांची यादी तयार करताना राज्यात अनेक कुटूंबांचे सर्वेक्षण न होणे, त्यामुळे खरोखरच दारिद्रय रेषेखाली असणाऱ्या कुटूंबांना पिवळया रंगाच्या शिधापत्रिकांपासून वंचित रहावे लागणे, शासनाच्या वतीने रुपये १५,००० उत्पन्न मर्यादा ठरविणे, मात्र वाढती महागाई आणि रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे ५०,००० वार्षिक उत्पन्न मर्यादा पात्र धरण्याची गरज निर्माण होणे, यामुळे राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल जनतेला दारिद्रय रेषेखालील योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे इष्टांक वाढवून घेण्याची मागणी करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

**मेघना तळेकर,**
सचिव- २,
महाराष्ट्र विधानसभा

**विधान भवन,**
मुंबई
दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२६

**<u>याची प्रत :</u>**

१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२) मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.
३) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी..
४) सचिव- १, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
५) सचिव- २, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
६) सचिव- ३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
७) सचिव- ४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.
८) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
१०) संगणक कक्ष (WEBSITE)
११) एम.के.सी.एल.